# दूरदृष्टी असलेले बहुआयामी व्यक्तिमत्त्व

मनात भाऊंना भेटताना नेहमी एकच विचार प्रत्येक वेळी आला, तो म्हणजे अशा वयात आपण जरी जगलो तरी एवढे ॲक्टिव्ह राहू का?



१९५० च्या दशकात पुण्याच्या ऐतिहासिक कृषी महाविद्यालयातून कृषी पदवी घेऊन भाऊंनी स्वतःचे एक मोठे साम्राज्य निर्माण केले. १९६० ते ६१ टिळकनगर श्रीरामपूर येथील महाराष्ट्र साखर कारखान्यामध्ये कृषी अधिकारी म्हणून व संजीवनी साखर कारखान्यावर सचिव म्हणून १९६१ ते ६५ या काळातील योगदान दिले. १९६३ -६४ या काळात निफाड सहकारी कारखान्यावर जनरल मॅनेजर म्हणून ते कार्यरत होते. १९७२-७८, १९८४ ते ९५ व त्यानंतर २००५ या काळात त्यांनी कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखाना, काकासाहेबनगर येथे अध्यक्ष म्हणून काम केले. १९७० मध्ये वडील कर्मवीर पद्मश्री काकासाहेब वाघ यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने क. का. वाघ शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. अगदी सुरुवातीपासूनच बाळासाहेब भाऊ हे उपाध्यक्षपदी २००६ पर्यंत कार्यरत होते. २०१६ पर्यंत संस्थेची संस्थेच्या पाच शाळा व एक महाविद्यालय होते. या संकुलाचा विस्तार आता ३० महाविद्यालये, तंत्रनिकेतन व शाळा अशा मोठ्या वटवृक्षामध्ये झाले आहे.

या जोरावर खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांचे महाराष्ट्राचे आणि भारताचे नेतृत्व आपोआपच भाऊंच्याकडे चालत आले. ते अभियांत्रिकी असोसिएशनच्या अध्यक्षपदी विराजमान झाले. दहा वर्षांच्या त्यांच्या प्रयत्नानंतर अभियांत्रिकी महाविद्यालयांना स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त करून देण्यात यश मिळाले. राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालय संस्थाचालकांना मार्गदर्शन करणे आणि प्रसंगी गरज लागेल त्यावेळी न्यायालयाचे दरवाजे ठोठावणे अशा सर्व मार्गांनी भाऊंनी हे शिवधनुष्य पेलले. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन महाराष्ट्राच्या दुसऱ्या जलसिंचन आयोगाचे ते सदस्य होते. निफाड कारखान्याच्या आणि रानवड येथील कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये कोल्हापूर बंधारे बांधणे व पाणी अडवण्यामध्ये त्यांनी मोलाची कामगिरी केली. त्याचबरोबर राज्यस्तरावरील खासगी विनाअनुदानित कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयांच्या संघटनेच्या स्थापनेमध्येसुद्धा त्यांनी मोलाची कामगिरी केली व २०२२ पर्यंत या संस्थेचे अध्यक्ष होते. पदवी महाविद्यालयांच्या बरोबरच महाराष्ट्र राज्य खासगी विनाअनुदानित तंत्रनिकेतन स्थापन करण्यामध्ये त्यांनी अध्यक्ष म्हणून सतरा वर्षे योगदान दिले. व्यवस्थापन आणि व्यावसायिक शैक्षणिक संस्थांच्या फेडरेशनचे राष्ट्रीय स्तरावरील उपाध्यक्ष म्हणूनसुद्धा भाऊंनी अनेक वर्षे काम पाहिले. १९८५ मध्ये पुण्याच्या डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनचे ते उपाध्यक्ष झाले. त्याचबरोबर पूर्वीची डेक्कन साखर संस्था म्हणून व त्यानंतर वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या विविध समित्यांवर त्यांनी काम केले. नॅशनल हेवी इंजिनिअरिंग लिमिटेड या साखर कारखानदारीच्या अभियांत्रिकी मशिनरीचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यावर ते संचालक होते. १९८७ मध्ये ते डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी ऑफ महाराष्ट्र असोसिएशनचे अध्यक्ष झाले. रानवड सहकारी लिफ्ट इरिगेशन योजनेच्या कार्यक्रमामध्ये ते अध्यक्ष होते. याशिवाय निफाड तालुका ग्राहक मंडळ, काकासाहेबनगर येथील ग्राहक सहकारी संस्थेचे संस्थापक संचालक, फळ व भाजीपाला संघाचे संस्थापक व मेडिकल ट्रस्ट अशा अनेक संस्थांशी ते जोडले गेले. लाइफटाइम एक्सलन्स मानपत्र त्यांना देऊन तंत्रनिकेतन क्षेत्रात योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. त्याचबरोबर शिक्षण क्षेत्राचा २०१३ चा पुरस्कार त्यांना नवी दिल्ली येथे देण्यात आला. उदय विद्यापीठाचा जीवनगौरव पुरस्कार भाऊंना मिळाला. मराठी पत्रकार संघातर्फे समाजवाद, रोटरी क्लबतर्फे शिक्षणमहर्षी पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. वयाच्या ८० व्या वर्षानंतर समाजाची काळजी करणारी माणसे आता अतिशय कमी झाली आहेत. अतिशय शिस्तबद्धपणे योग्य वेळी त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना ते त्यांच्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करत असतानाच शैक्षणिक क्षेत्राशी त्यांना जोडण्याचा प्रयत्न केला. या त्यांच्या कार्याची जवळून ओळख होण्याची संधी मला एक प्रशासकीय अधिकारी म्हणून मिळाली. आज भाऊंच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन.

**- शेखर गायकवाड,**
माजी सनदी अधिकारी

**Pudhari paper:dt.6-2-2026**